343

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/१७३ | २० फेब्रुवारी, २०१४

परिपत्रक क्र. १५५

**विषय :** मंत्रालयीन तसेच मध्यवर्ती कार्यालय स्तरावर बैठकांसाठी वा इतर कामासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे एकत्रित संकलन क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त होत नसल्याबाबत.

मंत्रालयीन स्तरावर वा मध्यवर्ती कार्यालय स्तरावर विविध बैठका आयोजित केल्या जातात. सदर बैठकीसाठी आवश्यक असणारी माहिती क्षेत्रीय म्हणजेच सर्व मुख्य अभियंता यांच्याकडून मागविली जाते. तथापि, क्षेत्रीय कार्यालयाकडून एकत्रित संकलित केलेली माहिती प्राप्त होत नाही. परिणामी, मध्यवर्ती कार्यालयात अशी माहिती एकत्रित संकलित करण्यासाठी या कार्यालय स्तरावरुन संबंधितांना अवगत करुन प्राप्त करुन घ्यावी लागते. यामध्ये बराच कालापव्यय होऊन, एकतर बैठकीस पुरेशी माहिती प्राप्त होत नाही व ती वेळेतही उपलब्ध करता येत नाही.

याचे मुख्य कारण हे विशेषत: मजीप्राच्या कामाचे वाटप ज्या दि. ३.११.२०११ च्या कार्यालयीन आदेशाद्वारे करण्यात आले आहे, त्या आदेशानुसार जरी कामाचे वाटप झाले असले तरी, प्रत्यक्षात काही कामे जसे सुजल निर्मल अभियान, पाणी पुरवठा केंद्रे व पाणी पुरवठा योजनेचे कार्यान्वयन भौगोलिक व प्रशासकीय बाबी विचारात घेऊन इतर मुख्य अभियंता यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहेत. त्यामुळे एखाद्या विषयाबाबत संकलित माहिती मागविली असता, ती केवळ त्या-त्या मुख्य अभियंता कार्यालयाकडे असलेल्या प्रत्यक्षातील कामाबाबतचीच उपलब्ध करुन दिली जाते.

वस्तुत: इतर मुख्य अभियंता कार्यालयाकडील माहिती परस्पर त्यांच्याकडून प्राप्त करुन उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. तथापि, याबाबत विचारणा केली असता, त्या विषयाबाबतची एकत्रित संकलित माहिती इतर मुख्य अभियंता यांच्याकडील माहिती त्या-त्या मुख्य अभियंतांकडुन उपलब्ध करुन दिली नसल्याबाबतची तक्रार संबंधित मुख्य अभियंता कार्यालयाकडून वारंवार केली जाते.

या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. मजीप्रांतर्गत सुरु असलेल्या विविध योजना/कामांबाबतची माहिती नियमितपणे संकलित करणे व मा.सदस्य सचिव यांच्याकडे सादर करणेबाबत मुख्य अभियंतानिहाय पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

| अ.क्र. | योजनेचे स्वरुप | संबंधित मुख्य अभियंता |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम, AUWSP व पूर्ण ठेव तत्वावरील कामे इ. | मु.अ., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे |
| २ | पाणी पुरवठा केंद्रांची माहिती | मु.अ., जलव्यवस्थापन, ठाणे |
| ३ | महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत प्रगतीपथावरील सर्व योजना | मु.अ., प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे |
| ४ | UIDSSMT, नगरोत्थान,NRAP | मु.अ., मध्यवर्ती नियोजन, मुंबई. |
| ५ | Liquid Waste Management, घनकचरा व्यवस्थापन इ. | मु.अ., अद्यावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक |

२. मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन कार्यालयाकडे जलव्यवस्थापन केंद्राशी निगडीत कामे असली तरी काही पाणी पुरवठा केंद्रे मुख्य अभियंता, ना.व ग्रा. योजना यांच्याकडे आहेत. त्यामुळे पाणी पुरवठा केंद्रांशी निगडीत एकत्रित माहिती जेव्हा मागविली जाते तेव्हा मुख्य अभियंता, नागरी व ग्रामीण योजना यांनी त्यांच्याकडील माहिती मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन यांच्याकडे उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य अभियंता, ना. व ग्रा.योजना यांच्याशी निगडीत असणाऱ्या कामांची माहिती जेव्हा मागविली जाते व त्यापैकी काही माहिती मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन व मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा यांच्याकडुनही घ्यावी लागत असल्याने, त्यांनी सदर माहिती मुख्य अभियंता, ना. व ग्रा.योजना यांना उपलब्ध करुन द्यावी.

४. मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा यांच्याकडील कामाशी निगडीत माहिती मागविली जाते तेव्हा व त्यापैकी काही माहिती मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन व मुख्य अभियंता, नागरी व ग्रामीण योजना यांच्याकडुनही घ्यावी लागत असल्याने, त्यांनी सदर माहिती मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा यांना उपलब्ध करुन द्यावी.

५. UIDSSMT, नगरोत्थान तसेच राष्ट्रीय नदी कृती योजनांच्या संदर्भात माहिती मागविली जाते. त्यावेळी या माहितीचे एकत्रित संकलन मुख्य अभियंता, मध्यवर्ती नियोजन, मुंबई यांनी करावे व त्यासाठी लागणारी माहिती मुख्य अभियंता, नागरी व ग्रामीण योजना,

जलव्यवस्थापन व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा यांनी, मुख्य अभियंता, मध्यवर्ती नियोजन यांना उपलब्ध करुन द्यावी.

सबब, यापुढे जेव्हा माहिती मागविली जाईल तेव्हा मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्यात येणारी माहिती ही एकत्रित संकलित केलेली राहील, याची जबाबदारी त्या-त्या मुख्य अभियंता कार्यालयाची राहील. त्यासाठी सर्व मुख्य अभियंता यांनी परस्पर समन्वय ठेवुन माहिती संकलित करावी व मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी.

या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(सोनिया सेठी) भाप्रसे
सदस्य सचिव

प्रत :

१. मुख्य अभियंता, अद्यावत तंत्रज्ञान सहाय्य, मजीप्रा, नाशिक.
२. मुख्य अभियंता, नागरी व ग्रामीण योजना, मजीप्रा, कोपरी, ठाणे.
३. मुख्य अभियंता, जलव्यवस्थापन, मजीप्रा, कोपरी, ठाणे.
४. मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, मजीप्रा, पुणे
५. मुख्य अभियंता, मध्यवर्ती नियोजन, मजीप्रा, मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई-२१
रवाना
2014
सही

E:\TS-I - 2014\TS- 1-Jan- 2014.doc/ Jyoti